पोलीस उप आयुक्त वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ ४९ /२०२४ दि. १८/०३/२०२४

## —:वाहतूक नियंत्रण अधिसुचना:—

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये **नौपाडा** वाहतूक उपविभागाचे हद्दीत नवीन आर. टी. ओ. ऑफिस कडून सर्व्हीस रोडने तीन हात नाका कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या दुचाकी, तीनचाकी, चारचाकी वाहने तसेच खाजगी व टीएमटी बसेस, ४०७ टेम्पो व त्यावरील सर्व जड अवजड वाहने रघुनाथनगर कडून तीन हात नाका जंक्शन मार्गे हरिनिवास सर्कल, मल्हार सिनेमा कडे जाताना तीन हात नाका या ठिकाणी अडथळा निर्माण होवून मोठया प्रमाणात वाहतूक कोडी होत असते. त्यामुळे सदर ठिकाणचे वाहतुकीत बदल करणे गरजेचे असून सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये वाहतुक सुरळीत व सुनिश्चित होण्याकरीता आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून,** मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :—

**प्रवेश बंद –** १) नवीन आर.टी.ओ. कार्यालय कडून सर्व्हिस रोडने तीन हात नाका जंक्शन कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना तीन हात नाका चौक येथे पिक अवर **१७:०० ते २३:०० वाजेपावेतो 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** नवीन आर.टी.ओ. कार्यालय कडून सर्व्हिस रोडने व रघुनाथनगर कडून जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना तीन हात नाका ऐवजी नितीन नाका येथे यु टर्न घेवून तीन हात नाका मार्गे इच्छित स्थळी जातील. तसेच सदर वाहने रघुनाथनगर ऐवजी १६ नंबर रोड, रहेजा गार्डन, मॉडेला चेकनाका, तीन हात नाका मार्गे पुढे इच्छीत स्थळी जातील.

**एकदिशा मार्ग –** नवीन आर.टी.ओ. कार्यालय कडून सर्व्हिस रोडने तीन हात नाका जंक्शन पर्यंत रस्ता **एक दिशा** मार्ग करण्यात येत आहे. रघुनाथनगर कडून तीनहातनाका कडे जाणाऱ्या सर्व प्रकरच्या वाहनांना १७:०० ते २३:०० वा.पावेतो मनाई करण्यात येत आहे.

सदर अधिसूचना प्रसिध्द झाल्या तारखेपासुन १५ दिवस प्रायोगिक तत्वावर लागू करण्यात येत आहे. काही हरकत अगर सुचना असल्यास त्या लेखी स्वरुपात पोलीस उप आयुक्त, शहर वाहतूक शाखा कार्यालय, तीन हात नाका, एल. बी. एस. मार्ग, ठाणे, ४००६०२ येथे पाठवाव्यात. याबाबत कोणाच्या काही हरकत अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदरची अधिसुचना पुढील आदेश होई पावेतो कायम स्वरुपात अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.

CamScanner

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालीका, ठाणे.
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
ठाणे पोलीस पत्रक

**प्रत** :– समन्वय अधिकारी ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,**
स.पो.आ. ठाणे/वागळे वाहतूक विभाग/पोनि नौपाडा, वागळे, राबोडी वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा. ठाणे च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.

CamScanner